# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** लोणी काळभोर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0145 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/03/2024 03:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 12/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/03/2024
**Time From (वेळेपासून):** 17:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/03/2024 **Time (वेळ):** 03:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/03/2024 03:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
ईशान्य, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मंडल अधिकारी कार्यालय, थेऊर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned by CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ओंकार नितीन पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो कोलवडी, ता हवेली, जि पुण,लोणी काळभोर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो कोलवडी, ता हवेली, जि पुण,लोणी काळभोर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय सुदाम नाईकनवरे | | | 1. सर्वे नं 191, भाजीमंडईजवळ, , नागपुर चाळ, येरवडा, पुणे , लोणी काळभोर,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | योगेश कांताराम तातळे | | | 1. बाळु कदम चाळ, चौधरी पार्क,, कलनी नं 2, दिघी, पुणे ,लोणी काळभोर,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 3 | श्रीमती जयश्री कवडे | | | 1. मंडल अधिकारी, थेऊर,लोणी |



Scanned by CamScanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7,000/ रुपये. | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

7,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि.13/03/2024

मी, ओंकार नितीन पवार, वय 25 वर्षे, धंदा व्यवसाय, रा. मु पो·कोलवडी, ता हवेली, जि पुणे मो.नं. 7972145808
समक्ष हजर राहुन फिर्यादी जबाब देतो की, मी दिनांक-07/03/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे- माझे वडीलांची आई बेबी सुदाम पवार, वय 70 वर्षे, हि आमचेकडे राहावयास आहे. माझे आजीचे आईचे वडील लक्ष्मण रामजी भाडळे रा. कोलवडी यांचे निधन झाले आहे.
मौजे कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे येथील सर्वे नं. 155/8 , गट नं. 697 याचे 7/12 उता-यावर यापुर्वी लक्ष्मण रामजी भाडळे यांचे नावाची नोंद होती, परंतु ती नोंद अचानकपणे कमी होऊन त्यामधील 5.34 आर एवढे क्षेत्र सौ. कमल दत्तात्रय गायकवाड यांचे नावावर नोंद करण्यात आलेली दिसुन आली. त्यामुळे माझे आजीचे वडील यांचे नाव 7/12 उता-यावर पुर्नस्थापित करण्यासाठी माझी आजी श्रीमती बेबी पवार व तिच्या बहिणी मुक्ताबाई काळे व सुभद्राबाई डोके यांनी मा. तहसिलदार, हवेली यांचेकडे अर्ज केले होते. त्या अर्जाबाबत तहसिलदार हवेली यांनी दि.18/12/2023 रोजी आमचे आजीचे बाजुने आदेश दिला आहे.
तहसिलदार हवेली यांचे आदेशान्वये कोलवडी गावचे तलाठी यांनी फेरफार नं 13902 अन्वये नोंद घेतली. सदरची नोंद मंजुर करण्यासाठी मंडल अधिकारी, थेऊर श्रीमती जयश्री कवडे यांचेकडे साधारण 1 मार्च 2024 रोजीचे सुमारास ऑनलाईन पाठविण्यात आली आहे. फेर फोर नोंद नं. 13902 हि मंजुर करण्यासाठी मी व माझे चुलते श्री दत्तात्रय सुदाम पवार रा. कोलवडी असे दि. 06/03/2024 रोजी मंडल अधिकारी कार्यालय थेऊर येथे जाऊन श्रीमती जयश्री कवडे यांना भेटुन विनंती केली असता त्यांनी आमचेकडे फेरफार मंजुर करणेसाठी त्यांचे शेजारी बसलेल्या एका अनोळखी इसमास (नाव माहित नाही) भेटण्यास सांगितले. मी व माझे चुलते असे मंडल अधिकारी कार्यालयाचे बाहेर येऊन त्या एका अनोळखी इसमाबरोबर बोललो असता त्याने फेरफार नोंद मंजुर करण्यासाठी 10,000/- रुपयाची मंडल अधिकारी श्रीमती जयश्री कवडे यांचेसाठी मागणी केल्याने ती देण्याची माझी इच्छा नसल्याने श्रीमती जयश्री कवडे, मंडल अधिकारी थेऊर व एक अनोळखी इसम यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी, वगैरे मजकुराची तक्रार दिली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद पुणे येथील दोन पंच बोलावुन घेऊन माझे तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.
त्यानंतर मी माझे गावाकडील इसमामार्फत माहिती घेतली असता, मंडल अधिकारी या कामानिमीत्त बाहेर असुन दि. 12/03/2024 रोजी कार्यालयात येतील असे त्यांनी सांगितल्याने त्यानुसार पुढील कारवाईकरण्याचे सर्वानुमते ठरविले.



Scanned by CamScanner

त्यानुसार दि.12/03/2024 रोजी मी कोलवडी या ठिकाणी थांबुन व दोन पंच व सापळा पथक यांना लक्ष्मी मंगल कार्यालय, कोलवडी-मांजरी रस्ता, कोलवडी या ठिकाणी येणेबाबत सांगितले. मी सापळा पथक यांना नमुद ठिकाणी भेटलो. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवुन लाच मागणी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मला व पंचाना सुचना दिल्या. व्हाईस रेकॉर्डरमध्ये नव्याने मेमरीकार्ड टाकुन आमचे पडताळणी निवेदन घेऊन सुचना देऊन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर देऊन मला व पंच नं 1 श्री. तुषार जाधव यांना पडताळणीकामी मंडल अधिकारी कार्यालय, थेउर येथे रवाना केले.
मी व पंच नं 1 श्री. जाधव असे माझेकडील चारचाकी वाहनाने मंडल अधिकारी कार्यालय, थेउर येथे गेलो असता त्या ठिकाणी यापुर्वी बोलणी केलेल्या अनोळखी इसमास भेटलो व कामाचे अनुषंगाने बोललो. त्यावेळी त्या अनोळखी इसमाने मला मॅडम इलेक्शन डयुटीला आहेत, तुम्ही मॅडमशी बोलुन घ्या असे सांगितले. त्यामुळे मी माझे मोबाईल नं.7972145808 यावरुन मॅडमचे मोबाईल नं.7721042276 यावर कॉल केला असता, त्यांनी मला ऑफिसमधील योगेश आणि छोटया आहेत त्यांचेशी बोलणेबाबत सांगितले. त्यावेळी केबीन नं 2 मध्ये बसलेला छोटा इसम याचे नाव योगेश असल्याचे समजले. त्यावेळी योगेश याने आम्हाला केबीन नं 3 मध्ये बसलेल्या इसमाकडे हाताने इशारा करुन त्यांना भेटण्यास सांगितले. केबीन नं 3 मध्ये बसलेल्या इसमासमोर लॅपटॉप होता. त्यावेळी त्या इसमाबरोबर लाचेच्या रक्कमेच्या अनुषंगाने बोलणे करता त्याने त्याचे दोन्ही हाताची दहा बोटे केबीन नं 2 मध्ये बसलेला योगेश यास दिसेल असे दाखवुन 10,000/- रुपयाची लाच मागणी केली. त्यावेळी मी त्यांना कमी करण्याबाबत बोललो असता त्याने दोन्ही हाताचे बोटापैकी सात बोटे दाखवुन 7,000/- रुपयाची लाच मागणी केली. त्यावेळी केबीन नं 2 मध्ये बसलेल्या योगेशने मान हलवुन इशारा करुन समंती दिली. सदरवेळी मंडल अधिकारी कार्यालयातील योगेश व दुसरा इसम यांनी मंडल अधिकारी श्रीमती कवडे यांचेसाठी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले व त्यास मंडल अधिकारी श्रीमती जयश्री कवडे यांनी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर मी लाच रक्कम 7000/- रुपये श्रीमती भोसले यांचेकडे हजर केली. सदरवेळी सापळापुर्व कारवाई दरम्यान 500/- रु दराच्या 14 नोटांचे नंबर कागदावर लिहुन त्याला अॅन्थ्रेसिन पावडर लाऊन व्हाईस रेकॉर्डर माझ्याकडे देऊन मला व पंच नं 1 श्री जाधव यांना सापळा कारवाईकामी मंडल अधिकारी कार्यालय, थेउर येथे रवाना केले व आमचे पुढे सापळा पथक असे गेले व मंडल अधिकारी कार्यालय येथे विखरुन थांबले.
मी मंडल अधिकारी कार्यालय, थेउर मध्ये कवडे मॅडम यंानी संागितलेले अनोळखी इसमास भेटलो व त्याने खाली जाण्याबाबत सांगितले व तो आमचे पाठीमागे येऊन त्या इसमाने एक रिकामे कागदाचे पाकीट माझे हातामध्ये देवुन त्यामध्ये पैसे ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी 7000/- रुपये त्या पाकिटामध्ये ठेवले. लोखंडी जिन्यावर लाच रक्कमेचे पाकिट त्या इसमाने स्वीकारुन ते त्याचे पॅन्टीचे उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवले. मी तात्काळ माझा गॉगल घालुन सापळा पथकास नियोजित इशारा केला असता सापळा पथक त्या ठिकाणी येऊन त्यांनी त्या इसमास ताब्यात घेतले. ती वेळ 17.50 वा होती. त्यावेळी सापळा पथकाने त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने - विजय सुदाम नाईकनवरे, वय 38 वर्षे, धंदा एजंट, रा. सर्वे नं 191, भाजीमंडईजवळ, नागपुर चाळ, येरवडा, पुणे मुळगाव पिंपळे जगताप, ता. शिरुर, जि पुणे मो नं 9970898709 असे सांगितले. विजय याचेकडुन लाच रक्कमेचे पाकीट हस्तगत केली.
त्यानंतर योगेश व मंडल अधिकारी श्रीमती कवडे यांना लाच रक्कम विजय याचेकडे दिलेबाबत सांगण्यासाठी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देऊन मी व पंच नं 1 श्री जाधव असे मंडल अधिकारी कार्यालयामध्ये जाउुन योगेश यास भेटलो . त्यावेळी योगेश याने मीच विजयला पैसे घेण्यासाठी सांगितले होते असे सांगितले. त्यानंतर त्याने त्याचे मोबाईल नंबर 9529881522 वरुन मंडल अधिकारी जयश्री कवडे यांना व्हॉटसअप कॉल केला. त्यानंतर कवडे मॅडमचा त्यांचे मो नं 7721042276 वरुन माझे मोबाईल नं. 7972145808 यावर कॉल आला, तेव्हा मी त्यांना "मॅडम ते तुम्ही सांगितल, केल ते सात हजार" असे म्हणालो असता, कवडे मॅडम यंानी "हा देते करुन, देते करुन" असे म्हणाल्या आहेत. त्यावेळी सापळा पथकाने योगेश याला ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने योगेश कांताराम ताथळे, वय 21 वर्षे, धंदा कॅन्डीडेट, मंडल अधिकारी कार्यालय, थेऊर, रा. बाळु कदम चाळ, चौधरी पार्क, कॉलनी नं 2, दिघी, पुणे मुळगाव मु पो. वचपे, ता आंबेगाव, जि पुणे मो नं 9529881522 असे नांव सांगीतले आहे. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे येऊन सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दि 12/03/2024 रोजी 17.50 वा. मंडल अधिकारी कार्यालय, थेउर येथे खाजगी इसम योगेश तातळे व विजय नाईकनवरे यांनी माझ्या आजीच्या आईच्या वडीलांचे नावाची फेरफार नोंद मंजुर करण्यासाठी मंडल अधिकारी जयश्री कवडे यांचेकरीता 10,000/- रुपयाची लाच मागणी करुन तडजोडीअंती रु.7,000/- ची लाच रकमेची पंचांसमक्ष मागणी केली व त्यास योगेश तातळे यांनी दुजोरा देऊन खाजगी इसम विजय नाईकनवरे यांनी रु.



Scanned by CamScanner

7,000/- ची लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले व मंडल अधिकारी जयश्री कवडे यांनी खाजगी इसम योगेश तातळे व विजय नाईकनवरे यांच्या लाच मागणीस व लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन माझी मंडल अधिकारी जयश्री कवडे व खाजगी इसम योगेश तातळे आणि विजय नाईकनवरे यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

वरील टंकलिखीत जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shashikant bharat chavan(I (Inspector)) / DGPSBCM7202 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

13/03/2024
Fir प्रत मिळाली

ठाणे अंमलदार
कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shashikant bharat cl

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSBCM7202



Scanned by CamScanner